# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

जा.क्र. दिनांक :

प्रति,

मा. प्राचार्य,
रासेयो पथक कार्यरत असलेले सर्व महाविद्यालये,
चंद्रपूर जिल्हा.

विषय : 'आव्हान'– आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व पूर्व प्रजासत्ताक दिन पथ संचलन प्रशिक्षणाकरिता जिल्हास्तरीय रासेयो निवड शिबीर.

महोदय,

वरील विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिल्ली येथे राष्ट्रीय व मुंबई येथे राज्यस्तरावरील प्रजासत्ताक दिन, २६ जानेवारी २०१८ च्या पथसंचलनासाठी स्वयंसेवक निवडीकरिता पुर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षण शिबीर आयोजित केले जाते. पुर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षण शिबीरात सहभाग घेण्याकरिता संलग्नित महाविद्यालयांच्या रासेयो पथकातील स्वयंसेवकांमधून जिल्हास्तरावर शिबीर आयोजित करून निवड करावयाची आहे. तसेच जून २०१८ मध्ये होणाऱ्या 'आव्हान'–आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी विद्यार्थ्यांची निवड याच शिबिरातून करण्यात येणार आहे.

उपरोक्त जिल्हास्तरीय निवड शिबीर कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर येथे दिनांक १ सप्टेंबर २०१७ रोज शुक्रवार ला सकाळी ९:३० वा. आयोजित करण्यात आले आहे.

या निवड शिबिरात सहभागी होण्यासाठी रासेयो कार्यपुस्तीकेत पृष्ठ क्र. १४ व १५ मध्ये नमुद केलेल्या नियम व अटीनुसार आपल्या महाविद्यालयातील ०२ रासेयो स्वयंसेवक व ०२ रासेयो स्वयंसेविकेची महाविद्यालय स्तरावर निवड करून नियोजित स्थळी दिलेल्या वेळेवर सहभागी करून सहकार्य करावे ही विनंती.

टिप: १) पुर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन प्रशिक्षणाकरीता रासेयो चे दुसरे वर्ष अनिवार्य आहे.
२) आव्हान–२०१८ करीता रासेयोचे प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी होवू शकतात.
३) सहभागी विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे सहभागाबाबतचे पत्र असावे.

Dr. N. S. Girde
N.S.S. District Co-Ordinator
प्रा. डॉ. एन. एस. गिरडे
रासेयो जिल्हा समन्वयक, चंद्रपूर.

भ्रमणध्वनी क्र. ९४२३६७५८८१, ९४०४५७२५३२
ई–मेल : girdenss@gmail.com

मा. प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये जिल्हा-चंद्रपूर उपरोक्त प्रमाणे महाविद्यालय स्तरावर स्वयंसेवक व स्वयंसेविकांची निवड करून जिल्हास्तरीय निवड शिबीरात विद्यार्थीना सहभागी करावे. (प्रवास खर्च रासेयो अनुदानातून अनुधेय राहील) (दि. 26.8.17)

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली